# वार्षिक अहवाल
# दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र
# विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे.
# शैक्षणिक वर्षे २०१९-२०

**समन्वयक- प्रा. डॉ. एस. जी. गोल्डे** **सदस्य - प्रा. डॉ. सी. एस. वाणी**

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्राचा वार्षिक अहवाल देतांना मला मनस्वी आनंद होतो की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संलग्न असलेले खानदेशातील एकमेव दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र विद्यावर्धिनी महाविद्यालयात गेल्या दशकापासुन कार्यरत असुन या विभागाव्दारे शासनाने घोषित केलेल्या विविध प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना नाममात्र शुल्कामध्ये प्रवेश दिला जातो.या शिवाय त्यांच्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करुन त्यांच्यातील विविध कलागुणांना चालना देण्याचे काम दिव्यांग विभाच्या माध्यमातुन केले जाते.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयात दिव्यांगाच्या वेगवेगळया प्रकारचे एकुन २८ दिव्यांग विद्यार्थी प्रवेशित असुन या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील दिव्यांग विभागाव्दारे विविध प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.जसे लेखनिक उपलब्ध करुन देणे, अदयावत सॉफ्टवेअरसह संगणक, ब्रेल लिपीमधील पुस्तके, व्हील चेअर, समाजकल्याण विभाग व इतर सामाजिक व स्वंयसेवी संस्थाकडुन शिष्यवृत्ती मिळवुन देण्यासाठी मदत केली जाते.

दिव्यांग विभागामध्ये जागतिक अपंग दिन, पांढरी काठी दिन, लुई ब्रेल जयंती या व्यतिरिक्त महाविद्यालयात होणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये सहभाग नोदविण्यासाठी विभागामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देउन सहभाग नोदविला जातो.

दिव्यांग विद्यार्थ्यांना परीच्या काळात लेखनिकाची आवश्यकता असते. या लेखनिकाची गरज विद्यावर्धिनी महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. पी. ओ. व्यास आणि इतर सर्वच सहकारी प्राध्यापक बंधु- भगिनी, कार्यालयातील सर्व कर्मचारी यांचे या विभागाला नेहमीच सहकार्य करतात.या निमित्ताने सर्वांचे आभार व्यक्त करणे माझे कर्तव्य समजतो.

## दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव २०२०

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग व दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे आयोजित एकदिवशीय विद्यापीठ स्तरीय दिव्यांग विद्यार्थी कलामहोत्सव २०२० चे आयोजन विभागामार्फत करण्यात आले.

दिव्यांग विद्यार्थी कला कलामहोत्सवाच्या उद्घाटनासाठी महाबळेश्वर येथील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्रसिध्द दिव्यांग उद्योगपती मा. श्री. भावेश भाटीया यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. तर महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. डॉ. शुभदा ठाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. तर विद्यार्थी विकास विभाग प्र.संचालक मा.श्री. प्रा. डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कबचौ.उमवि.जळगांव विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.श्री.पी.पी.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य मा.श्री.दिलीपदादा पाटील, विद्यावर्धिनी सभेचे सन्मानीय अध्यक्ष प्रा.पी.डी.दलाल, उपाध्यक्ष श्री. केशवभाऊ बहाळकर, सचिव, मा.श्री. युवराजआबा करनकाळ, चेअरमन मा.श्री.अक्षयभाऊ छाजेड, व्हा.चेअरमन मा.उदयभाऊ शिनकर, श्री. पितांबरदादा महाले, डॉ.अभय शिनकर, श्री. विनोदभाऊ अग्रवाल, प्रा.अनिल दामोदर, श्री.राजेंद्र जैन, डॉ.जयश्री गावित,आदि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ. सर्जेराव गोल्डे व सहसमन्वयक प्रा.डॉ. चंद्रकांत वाणी यांनी परिश्रम घेतले.

दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सवात कबचौ.उमवि.परिक्षेत्रातील जळगांव, धुळे , नंदुरबार येथील एकुण ६० दिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या कला महोत्सवात नृत्य, गीतगायन , काव्यवाचन चित्रकला, निंबध, या कलाप्रकारात सहभाग घेतला. वरील कलाप्रकाराचे दिवसभर सादरीकरण करुन दुपारी ५ वा. व्यवस्थापन परीषद सदस्य मा. श्री. दिलीपदादा पाटील यांच्या उपस्थीत समारोप करुन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.व राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

हा दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव यशस्वी करण्यामध्ये विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाचे प्र.संचालक, व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विद्यावर्धिनी सभेचे सर्व सन्मानीय पदाधिकारी व महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक बंधु व भगिनी, विद्यार्थी विकास अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्चयक व सर्व प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी सहकार्य करून दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव २०२० यशस्वी केला.

**दिव्यांग विभागाव्दारे घेण्यात येणारे विविध कार्यक्रम /उपक्रम-**

- हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन प्रा.लि. मुंबई या संस्थेकडे शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालयातील दिव्यांग विभागामार्फत दिव्यांग व इतर मागास प्रवर्गातील एकुन ५० विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज पाठविण्यात आले होते. यापैकी १७ दिव्यांग व २९ इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी एकुन ४६ विद्यार्थ्यांना रु. २७९८००/- ची शिष्यवृत्ती मिळवुन देण्यात विभागाने मदत केली.
- दिव्यांग विभागामार्फत हेल्प द ब्लाईंड फाऊंडेशन चेन्नई या संस्थेकडे एकुन १० दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज पाठविण्यात आले होते. या संस्थेकडुन रु.७०,०००/-ची श्सिष्यवृत्ती मिळाली. पैकी ०७ दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १०,०००/- ची शिष्यवृत्ती मंजुर झाली.या विद्यार्थ्यांना धनादेशाव्दारे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.
- क.ब.चौ.उ.म.वि. जळगांव आयोजित ३ डिसेंबर २०१९ रोजी जागतिक अपंग दिनाच्या कार्यक्रमासाठी दिव्यांग विभागातील १४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
- दिव्यांग विभागात दिनांक ४ जानेवारी २०२० रोजी लुई ब्रेल यांची यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी लुई ब्रेल यांच्या प्रतिमेला विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे व्हा. चेअरमन मा.उदयभाऊ शिनकर यांच्या हस्ते माल्यार्पन करण्यात आले.यावेळी महाविद्यालसाचे प्राचार्य डॉ. शुभदा रावळ व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक उपस्थित होते.
- दिनांक ४ जानेवारी २०२० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई. व विद्यावर्धिनी महाविद्यालय मराठी विभाग आयोजित नवलेखक कार्यशाळा (कथा लेखन) या कार्यशाळेत दोन दिव्यांग विद्यार्थिनीने सहभाग घेतला.
- क.ब.चौ.उ. म. वि. जळगाव आयोजित विद्यापीठ स्तरीय युवारंगमध्ये विभागातील विद्यार्थी विनय अनंत वाघ याने सहभाग घेतला.
- महाविद्यालयाच्या कलामहोत्सवात विभागातील कविता विलास चव्हाण, सुवर्णा यादव पाटील, विनय अनंत वाघ, किशोर भानुदास जराड, परमेश्वर साहेबराव साळवे आदि विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकारात सहभाग घेतला.